सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग

नागरिकांची सनद

जलविज्ञान भवन,
सी.डी.ओ.- मेरी परिसर,
दिंडोरी रोड,
नाशिक – ४२२००४ (भारत).
दूरध्वनी – ०२५३ – २५३०२२७
ई-मेल : **cehp.nashikwrd@maharashtra.gov.in**
वेबसाईट : **www.mahahp.gov.in**

मुख्य अभियंता,
जलविज्ञान व धरण सुरक्षितता, नाशिक

१. प्रास्ताविक:

राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्पाच्या अंतर्गत राज्यातील भूपृष्ठ जलासंबंधी आधार सामग्री संकलनासाठी जागतिक बँकेच्या अटींची पूर्तता करून त्यांच्या अर्थसहाय्यातून मुख्य अभियंता, जलविज्ञान प्रकल्प, नाशिक या कार्यालयाची निर्मिती शासन निर्णय दिनांक १४/०६/१९९६ अन्वये करण्यात आली आहे. सदर कार्यालयाचे नामांकन हे कार्यालयीन फेररचनेमध्ये शासन निर्णय दि. १२/१०/२०१० प्रमाणे मुख्य अभियंता नियोजन व जलविज्ञान असे करण्यात आले. दि.१४/०१/२०१५ च्या शासन निर्णयान्वये धरण सुरक्षितता संघटना नाशिक (उपकरणे संशोधन विभागासह) या कार्यालयास संलग्न झालेले आहेत. तसेच शा. नि. दि. १७/०९/२०२० अन्वये या कार्यालयाचे नाव 'मुख्य अभियंता, जलविज्ञान व धरण सुरक्षितता' असे करण्यात आले.

महाराष्ट्रामध्ये निरनिराळया प्रकारची (काँक्रीट, दगडी, माती धरणे इ.) अशी एकूण २०५९ मोठी धरणे बांधून पूर्ण झालेली आहेत. बांधकामाधीन धरणे २८३ असून एकूण २३४२ धरणे आहेत . या धरणांच्या खालील बाजूस नदी किनारी महत्वाची गावे तसेच शहरे वसली आहेत. म्हणून महाराष्ट्र राज्यातील मोठया धरणांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य उपाययोजना व्हावी व धरणा पासून संभाव्य जिवित व वित्त हानी टाळता यावी या उददेशाने शासनाने पा.वि./१०७८/२३/८/आयएमपी/२ दि. १०/०९/१९८० अन्वये धरण निरिक्षणालय, नाशिक या कार्यालयाची निर्मिती केली. कामाचा वाढता व्याप लक्षात घेऊन मार्च - १९८५ मध्ये धरण निरिक्षणालयाचे नामकरण धरण सुरक्षितता संघटना म्हणून करण्यांत आले.

२. उद्दिष्टे :

विश्वसनिय जलशास्त्रीय माहिती प्रणाली विकसित करून तिची यशस्वीपणे अमलबजावणी करणे, हा जलविज्ञान प्रकल्पाचा मुख्य उद्दिष्ट आहे. त्याकरीता जलहवामान केंद्रांच्या पायाभूत सुविधांची सुधारणा व सबलीकरण करणे, सहभागी मनुष्यबळाला मोठ्याप्रमाणात प्रशिक्षण देणे व तसेच आधार सामग्रीचे संगणकीकरण करून अर्थपूर्ण विष्लेषण करणे व उपभोक्त्यांना आधार सामग्री वितरीत करणे.

जलविज्ञान प्रकल्प टप्पा क्र.१ चे उद्दिष्ट

- आधारसामग्री मूलभूत मापदंडे मापन आणि संकलनासाठी आधुनिक तंत्र आणि उपकरणे वापरणे.
- 'स्वदेस' व 'हायमॉस' या संगणक प्रणालीद्वारे जलहवामान व जलगुणवत्ता आधार सामग्रीचे संगणीकृत दृढीकरण करणे.
- जलहवामान व जलगुणवत्ता आधार सामग्रीचे सोप्या व युजर फ्रेंडली पद्धतीने वितरण करणे.
- जलहवामान आधार सामग्री उपभोक्ता गटातील पात्र सभासदाकरीता प्रकाशने वाढविणे व इतर माहिती उपलब्ध करून देणे.
- जलहवामान आधार सामग्री संकलन केंद्रांचे व जलगुणवत्ता प्रयोगशाळेचे स्तर उंचावणे.
- जलस्रोत व इतर गोष्टींचे नियोजन करणे.
- मुलभूत जलस्रोताचे व संबंधित कामाचे मूल्यमापन करणे

- पूर नियंत्रक प्रणालीचे मजबुतीकरण करणे.
- जलसाठ्याचे गाळ अभ्यास करणे.

जलविज्ञान प्रकल्प टप्पा क्र.२ चे उद्दिष्ट

- जलस्रोतिय नियोजन व व्यवस्थापन संबंधित असलेल्या संभाव्य वापरकर्त्यांनी विश्वसनिय व प्रभावी जलशास्त्रीय माहिती प्रणालीचा वापर वाढविणे.
- राज्य / केंद्रातील संस्थेमध्ये पाण्याशी संबंधित गुंतवणूकीमधील उत्पादनामध्ये प्रभावी वाढ होणेसाठी.

राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्पाचे उद्दिष्टे

- जलविज्ञान प्रकल्प टप्पा १ व २ अंतर्गत निर्माण केलेल्या पायाभूत सुविधा सुस्थितीत ठेवणे, त्याची देखभाल व दुरुस्ती व दर्जावाढ.
- जलविज्ञान प्रकल्प टप्पा २ अंतर्गत कृष्णा व भीमा खोऱ्याकरीता एककालिक आधार सामग्री संकलन प्रणाली कार्यान्वित करण्यात आली. टप्पा-३ मध्ये पंचगंगा उपखोऱ्यात अशीच यंत्रणा बसविण्यात आली आहे.
- एककालिक आधार सामग्री संकलन प्रणाली व संगणक आज्ञावली विकसित करणे या बाबी उर्वरित महाराष्ट्रातील गोदावरी खोरे, तापी खोरे, विदर्भातील वैनगंगा खोरे व पश्चिम वाहिनी नदी खोरे (अंशत:) ह्या नदीखोऱ्यात प्रस्तावित आहे.

धरण सुरक्षितता संघटनेची उद्दिष्ट्ये :

- क्षेत्रिय कार्यालयांना धरणातील धरण सुरक्षिततेच्या अनुषंगाने क्षती/संभाव्य क्षती ओळखण्यास सहाय्य करणे.
- राज्यातील क्षेत्रीय कार्यालयांसाठी धरण सुरक्षेबाबत समन्वयात्मक आणि सल्लागार भूमिका पार पाडणे.
- धरण सुरक्षिततेच्या अनुषंगाने मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे , तांत्रिक साहित्य संकलित करणे, प्रशिक्षण आयोजित करणे इ.
- धरण सुरक्षेबाबत राज्यात जनजागृती करणे.

३. दृष्टीक्षेप :

दर्जेदार नेतृत्व उभे करणे व सकारात्मक वातावरण विकसित करून संस्थेला सर्वोत्कृष्ठ स्थान मिळवून देणेसाठी सर्वोपरी प्रयत्न करून जलहवामान आधार सामग्री माहिती प्रणालीसाठी भारत वर्षामध्ये सर्वोच स्थान प्राप्त करणे. जलहवामान आधार सामग्री व जलगुणवत्ता आधार सामग्री संकलित करणे, दृढीकरण करणे व वितरण करणे उपभोक्त्यांना वितरीत करणे जेणेकरून उपभोक्त्यांच्या गरजा प्रभावीपणे पूर्ण होतील. तसेच पाण्याचे प्रभावी वापर होणेकरीता राज्याकारीता पाण्याचे धोरण ठरविणे व त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे.

४. मुख्य अभियंता, जलविज्ञान व धरण सुरक्षितता नाशिक कार्यालयाचे संघटन तक्ता



५. कामाची रचना:

मुख्य अभियंता, जलविज्ञान व धरण सुरक्षितता,नाशिक अंतर्गत खालील प्रमाणे मंडळ कार्यालये कार्यरत आहे.

- अधीक्षक अभियंता, आधार सामग्री संकलन, नियोजन व जलविज्ञान मंडळ नाशिक
- अधीक्षक अभियंता,आधार सामग्री पृथ:करण मंडळ,नाशिक.
- अधीक्षक अभियंता,धरण सुरक्षितता संघटना मंडळ,नाशिक.

५.१ अधीक्षक अभियंता, आधार सामग्री संकलन, नियोजन व जलविज्ञान मंडळ नाशिक.

आधार सामग्री संकलन, नियोजन व जलविज्ञान मंडळ, नाशिक अंतर्गत ५ विभाग कार्यरत आहेत. जलविज्ञान प्रकल्प विभागांची मुख्यालये पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर व ठाणे येथे असून विभागांचे कार्यक्षेत्र खालीलप्रमाणे आहे.

१. जलविज्ञान प्रकल्प विभाग, पुणे, कृष्णा खोरे (भिमा उपखो-यासह)
२. जलविज्ञान प्रकल्प विभाग, औरगाबाद, (गोदावरी खोरे)
३. जलविज्ञान प्रकल्प विभाग, अमरावती, तापी (पुर्णा तापीसह)
४. जलविज्ञान प्रकल्प विभाग, नागपूर, गोदावरी खो-याच्या पैनगंगा खो-यातील सहस्त्र कुंडाचे खाली व त्यापलीकडे उपखोरी.
५. जलविज्ञान प्रकल्प विभाग, कळवा(ठाणे), कोकणातील सर्व पश्चिम वाहिनी नद्या.

पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर व ठाणे येथील जलविज्ञान प्रकल्प विभाग पर्जन्यमान, हवामान, नदीत सोडलेल्या पाण्याची पातळी, जलाशयात येणारे पाणी, जलगुणवत्ता इ. जलविज्ञान आधार सामग्री संकलनाचे काम करतात. हया विभागांनी जलविज्ञान विषयक आधार सामग्री शास्त्रीय पध्दतीने मिळविल्यानंतर संकलन, पृथ:करण व प्रसिध्दीसाठी आधार सामग्री पृथ:करण मंडळ, नाशिक येथे पाठविण्यात येते.

आधार सामग्री संकलन, नियोजन व जलविज्ञान मंडळ, नाशिक अंतर्गत आधार सामग्री संकलन केंद्रांची माहिती दर्शविणारा तक्ता.

तक्ता — १ (ज.प्र. अंतर्गत पारंपारिक केंद्रांचे तपशील)

अ.क्र.	केंद्राचे प्रकार	केंद्रांची संख्या
१.	साधे पर्जन्यमापन केंद्र (SRG)	५८९
२.	स्वयंचलित पर्जन्यमापन केंद्र (ARG)	३४६
३.	हवामान केंद्र (FCS)	१५२
४.	सरितामापन केंद्र (GD)	२५३
५.	जलगुणवत्ता प्रयोगशाळा स्तर-२	०६
६.	जलगुणवत्ता केंद्र	१३०

जलविज्ञान प्रकल्पातील जलहवामान आधार सामग्री संकलन करण्याची पद्धती

- पर्जन्यमान - प्रत्येक तासाला (स्वंयचलित), दिवसातून एकदा (साधे)
- कमाल व किमान तपमान - दिवसातून २ वेळा.
- शुष्क व आर्द्र तपमान - दिवसातून २ वेळा.
- मोजपात्रातील पाण्याचे बाष्पीभवन - दिवसातून २ वेळा.
- बाष्पीभवन मोजपात्रातील पाण्याचे तपमान - दिवसातून २ वेळा.
- सापेक्ष आर्द्रता - दिवसातून २ वेळा.
- वा-याचा वेग - दिवसातून २ वेळा.
- वा-याची दिशा- दिवसातून २ वेळा.
- सूर्यप्रकाशाचा कालावधी - प्रत्येक तासाला.

जलगुणवत्ता:

शेतीसाठी,कारखान्यासाठी आणि पिण्यासाठी लागणा-याची पाण्याची गुणवत्ता उत्तम दर्जाची असणे आवश्यक असते.त्या करीता पाण्यातील घटकांचे परिक्षण प्रयोगशाळेत केले जाते. जलविज्ञान प्रकल्प अधिनस्त एकूण सहा जलगुणवत्ता प्रयोगशाळा कार्यरत असून त्यामध्ये नागपूर, औरंगाबाद, नाशिक, ठाणे, कोल्हापूर व पुणे ह्या जलगुणवत्ता प्रयोगशाळा कार्यरत आहेत.

राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्प (NHP)

जलविज्ञान प्रकल्प टप्पा-२ चे काम पूर्ण झाल्यानंतर जागतिक बँक व केंद्र शासन अर्थसहाय्यित राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्पाचे टप्पा-३ चे काम केंद्रीय जलसंधारण मंत्रालय नवी दिल्ली यांनी प्रस्तावित केलेले आहे. या प्रकल्पाचा कालावधी ८ वर्षाचा राहणारा असून प्रकल्पाची व्याप्ती संपूर्ण देशभर आहे.

या प्रकल्पांतर्गत राज्यातील तापी,गोदावरी (मराठवाडा व विदर्भ), कोकण अंशत: कृष्णा खो-यातील (जलविज्ञान प्रकल्प टप्पा-२ मध्ये अंतर्भुत नसलेली) पर्जन्यमापन,हवामान, सरीतामापन केंद्रांचे व जलाशयाचे दरवाजे यांचे एककालिक आधारसामग्री संकलन प्रणाली (Real Time Data Acquisition System) मध्ये रुपांतरीत करणे.

जलगुणवत्ता प्रयोगशाळा स्तर-II चे अद्यावतीकरण करणे

जळगाव येथे नविन जलगुणवत्ता प्रयोगशाळा स्तर -२ चे बांधकाम व उपकरणे संच तसेच अस्तित्वातील जलगुणवत्ता प्रयोगशाळा स्तर-२ अद्यावत करणे. प्रकल्प उभारणी व सनियंत्रणासाठी विविध तज्ञ सल्लागारांची नेमेणुक करणे, जलगुणवत्ता प्रयोगशाळेसाठी व आधारसामग्री संकलनासाठी लागणारे क्षेत्रिय व तांत्रिक मनुष्यबळ इ. बाबींचा समावेश आहे.

राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्पांतर्गत प्रस्तावित केंद्राचे जाळे.

राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्पांतर्गत उभारण्यात येणारे एककालिक आधारसामग्री संकलन प्रणाली व अस्तत्वातील आधार सामग्री संकलन केंद्रांचे एकुण जाळे खालिलप्रमाणे आहे.

तक्ता क्र. २ (क्रिष्णा-भीमा खोऱ्यातील कार्यरत असलेली व राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्पांतर्गत प्रस्तावित केंद्राचे तपशील)

अ. क्र.	नदी खोरे	स्वयंचलीत पर्जन्यमापन केंद्रे (ARS)	हवामान केंद्रे (AFCS)	सरीतामापन केंद्रे (ARWL & RDS)	जलाशयावरील जलपातळी व विसर्ग मापन केंद्रे (ARWL & ODS)	बाष्पीभवन पात्र (E-Pan)	स्पिलवे गेट सेंसर / धरण (AMGO)	एकुण	शेरा
०१	गोदावरी	१४२	८	२८	९३	२८	५७७/५०	२९९	प्रस्तावित
०२	तापी	९७	६	१९	३६	६	१७१/१६	१८०	प्रस्तावित
०३	कृष्णा	१२७	३९	३७	४६	०	१७१/२६	२४९	कार्यरत
		१८	१	६	८	१८	७२/१०	६१	प्रस्तावित
०४	कोकण	३९	२	१६	३	३	११/३	६३	प्रस्तावित

५.२ अधीक्षक अभियंता, आधार सामग्री पृथ:करण मंडळ, नाशिक

या मंडळांतर्गत एकुण ४ विभाग कार्यरत असून त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

१. कार्यकारी अभियंता, जलहवामान आधार सामग्री प्रक्रिया विभाग, नाशिक.
२. कार्यकारी अभियंता, जलनियोजन विभाग (येवा), नाशिक.
३. कार्यकारी अभियंता, जलनियोजन विभाग (पूर), नाशिक.
४. संशोधन अधिकारी, जलगती संशोधन विभाग क्र.१, नाशिक.

प्रत्येक विभागनिहाय करण्यात येणाऱ्या कामांची माहिती संक्षिप्त स्वरुपात खालीलप्रमाणे आहे

अ. कार्यकारी अभियंता, जलहवामान आधार सामग्री प्रक्रिया विभाग, नाशिक

SWDES, HYMOS या संगणकीय प्रणालीद्वारे उर्ध्व गोदावरी, निम्न गोदावरी, तापी, कोकण, कृष्णा-भिमा खोऱ्यातील जलहवामान केंद्रांतर्गत प्राप्त आधार सामग्रीचे अंतिम दृढीकरण करणे व सदर आधार सामग्री राज्यस्तरिय आधार सामग्री साठवण केंद्र नाशिक येथे पाठविणे, जलगुणवत्ता आधार सामग्रीचे एकत्रीकरण करणे, 'www.mahahp.gov.in.' या जलविज्ञान प्रकल्प संकेतस्थळाचे व्यवस्थापन करणे, तसेच राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्प अंतर्गत '**State Chapter of India-WRIS**' विकसित करणे, जलहवामान आधार सामग्री उपभोक्ता गटाच्या सदस्यत्व नोंदणी व नुतणीकरणाचे कामे, **WISDOM** या संगणक प्रणालीद्वारे आधार सामग्री उपभोक्ता गटाच्या सदस्यांना जलहवामान व जलगुणवत्ता आधार सामग्री वितरीत करणे, राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्पांतर्गत **WIMS** संगणक प्रणालीचे सनियंत्रण करणे, राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्पांतर्गत विविध प्रशिक्षण आयोजित करणे व व्यवस्थापन करणे, वार्षिक जलपुस्तिका प्रसिद्ध करणे, इत्यादी कामे या विभागामार्फत केली जातात.

ब. कार्यकारी अभियंता, जलनियोजन विभाग (येवा), नाशिक

प्रकल्पस्थळी येवा अभ्यास (**Yield Study**), नविन प्रस्तावित प्रकल्पांना पाणी उपलब्धता व जलशास्त्रीय अभ्यास तपासणे, नदी खोऱ्यातील उपखोरेनिहाय एकात्मिक जल आराखडयांचा जलशास्त्रीय अभ्यास , राज्य तांत्रिक सल्लागार समिती - रा. तां. स. स. (SLTAC) मधून प्राप्त प्रस्तावांची जलशास्त्रीय तपासणी अशा प्रकारची कामे या विभागामार्फत केली जातात.

क. कार्यकारी अभियंता, जलनियोजन विभाग (पूर), नाशिक

मोठया व मध्यम प्रकल्पांचा "पूर अभ्यास" व सुधारित पूर अभ्यास करण्याचे काम, प्राप्त प्रकल्पांचा समरुपता अभ्यास (Simulation Study) तपासणी, पूर रेषा आखणीसंबंधीची कामे व महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक मार्फत क्षेत्रिय अभियंत्याना प्रशिक्षण, राज्य तांत्रिक सल्लागार समिती - रा. तां. स. स. (SLTAC) कडे आलेल्या सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावांची पूर अभ्यासाची तपासणी अशा प्रकारची कामे या विभागामार्फत केली जातात.

ड. संशोधन अधिकारी, जलगती संशोधन विभाग क्र.१, नाशिक

जलगती संशोधन विभाग क्र.1, नाशिक अंतर्गत करण्यात येणारी कामे

१) धरणाच्या पश्चजल पातळीचा अभ्यास:-

HECRAS या संगणक प्रणालीचा वापर करुन प्रकल्पांच्या पश्चजल पातळीचा अभ्यास, या संदर्भात महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण -२०२०/प्र.क्र.३२३/मो.प्र.-२ दिनांक १७ फेब्रुवारी २०२१ अन्वये पश्चजल पातळीचा अभ्यास अशा प्रकारची कामे या विभागामार्फत केली जातात.

२) कालव्याचे विसर्गमापन तथा S.W.F. चे अंशशोधन –

कालव्याचे विसर्ग मापन व S.W.F. अंशशोधनाची कामे विभागास क्षेत्रीय अधिका-यांकडून प्रस्तावित केली जातात. विसर्गमापनाबाबत IS : ११९२-१९८१ प्रमाणे क्षेत्रीय पूर्वतयारी व विसर्ग मोजण्याबाबत क्षेत्रीय कार्यालयाने तयारी केल्यानंतर सदर काम केले जाते. सर्वसाधारणपणे मुख्य कालव्याचे विसर्गमापन व S.W.F. अंशशोधन केले जाते.

५.३ अधीक्षक अभियंता, धरण सुरक्षितता संघटना मंडळ, नाशिक

धरण सुरक्षितता संघटना मंडळ नाशिक अंतर्गत एकूण सहा विभाग कार्यरत आहेत;

१. कार्यकारी अभियंता, धरण सुरक्षितता विभाग क्र.१, नाशिक (कोकण व पुणे क्षेत्र)
२. कार्यकारी अभियंता, धरण सुरक्षितता विभाग क्र.२, नाशिक (अमरावती व नागपूर क्षेत्र)
३. कार्यकारी अभियंता, धरण सुरक्षितता विभाग क्र.3, नाशिक (नाशिक व औरंगाबाद क्षेत्र)
४. कार्यकारी अभियंता, कालवा सुरक्षितता विभाग, नाशिक

अ. वैज्ञानिक अधिकारी, गणितीय कक्ष नाशिक

५. संशोधन अधिकारी, उपकरणे संशोधन विभाग, नाशिक

ब. उपकरणे प्राप्ती कक्ष

क. उपकरणे निर्मिती कक्ष

ड. उपकरणे दुरुस्ती कक्ष

इ. भुकंप उपकरणे कक्ष

ई. भूकंप आधार सामग्री पृ:थकरण कक्ष

६. कार्यकारी अभियंता, धरण सुरक्षितता कक्ष नाशिक

धरण सुरक्षितता मंडळाचे उद्दीष्ट व रचना —

१. धरण सुरक्षिततेची प्राथमिक जबाबदारी मुख्यत: क्षेत्रिय अधिका-यांची आहे. ती योग्य रितीने पार पाडली जाते की नाही यावर सनियंत्रण या संघटनेमार्फत ठेवण्यांत येते.

२. मोठया धरणांची चाचणी तपासणी

या संघटनेकडून दर वर्षी काही धरणांची तपासणी केली जाते. या तपासणीत पूर्वी आढळून आलेले दोष व उणिवा यासंबंधी केलेली कार्यवाही तपासली जाते. तसेच एखादया धरणांस धोका उत्पन्न झाल्यास विशेष तपासणी केली जाते, व त्या त्रुटी सर्व संबंधीत क्षेत्रिय अधिका-यांना कळविल्या जातात व खाजगी संस्थाकडील सर्व धरणांची सल्लामसलत तत्वावर पर्जन्यपुर्व (Premansoon) व पर्जन्योत्तर (Postmansoon) तपासणी करण्यात येते.

३. त्रुटी पूर्तता उपाययोजना.

धरणांची तपासणी करतांना आढळलेल्या त्रुटींवर ही संघटना उपाययोजना सुचवित असते. क्षेत्रिय अधिका-यांकडून प्राप्त झालेल्या पावसाळा पूर्व व पावसाळा उत्तर तपासणी अहवालांची संघटनेमध्ये छाननी केली जाते.

या धरणस्थिती अहवालामध्ये महत्वाच्या त्रुटी व त्यावर करावयाच्या उपाययोजना सुचविण्यात येतात. धरणस्थिती अहवाल त्रुटी पूर्ततेसाठी सर्व संबंधित क्षेत्रिय अधिका-यांना दरवर्षी पाठविण्यात येतो.

४. धरणांवरील उपकरणे

विभागांतर्गत पाच कक्ष कार्यरत असुन त्यांचे कामाचे वाटप खालील प्रमाणे आहे

अ. उपकरणे प्राप्ती कक्ष -

मोठे व मध्यम प्रकल्पावर स्थापित केलेल्या धरण सुरक्षा उपकरणांची तपासणी , दुरुस्तीबाबत मार्गदर्शन, , व नव्याने बांधण्यात येणाऱ्या मोठया व मध्यम प्रकल्पांचे प्रकल्पावर धरण सुरक्षा उपकरणे बसवितांना मार्गदर्शन ,सदस्य सचिव तांत्रिक विनिर्देश समितीची कामे-या समिती मार्फत खरेदी करण्यांत येणाऱ्या साहित्यादी निविदा प्रक्रिया पूर्ण करणे व त्यासंबंधीचा पत्रव्यवहार अशा प्रकारची कामे या कक्षामार्फत केली जातात.

ब. उपकरणे निर्मिती कक्ष -

- जलसंपदा प्रकल्पावरील धरण सुरक्षा उपकरणांची निर्मिती उभारणी व दुरुस्तीची कामे करणे. यात प्रामुख्याने सुलटा ओळंबा, उलटा ओळंबा, अपलिफट प्रेशर सेल, बाष्पिभवन मापक यंत्रे इ. उपकरणांची निर्मिती , उभारणी व दुरुस्तीची कामे.

क. उपकरणे दुरुस्ती कक्ष -

जलसंपदा विभागातील स्थापत्य कामे करतांना कराव्या लागणाऱ्या सर्वेक्षण कामासाठी उपयोगाची गणितीय व शास्त्रिय उपकरणांची दुरुस्ती (डंपी लेव्हल, प्रिझेमॅटीक कंपास, थियोडोलाइट स्टँड व स्टाव्ह इ.)तसेच या उपकरणांची दुरुस्ती तसेच अंशशोधन (Calibration) ही कामे केली जातात.

ड. भुकंप उपकरणे कक्ष -

महाराष्ट्र राज्यामधील भूकंपिय घडामोडी बाबत शिखर संस्था म्हणून कामे पहाणे, ३५ भूकंपमापन वेधशाळा व १३ प्रवेगमापन यंत्राची तपासणी / निगराणी / दुरुस्ती ,नाशिक भूकंप मापन वेधशाळेचे दैनंदिन काम अशा प्रकारची कामे या कक्षामार्फत केली जातात.

इ. भूकंप आधार सामग्री पृ:थकरण कक्ष -

३५ भूकंप मापन वेधशाळा व १३ प्रवेग मापन यंत्राची माहिती जमा करणे व त्याचे पृ:थकरण,नाशिक भूकंपमापन वेधशाळेचे दैनंदिन पृ:थकरण ,भूकंपा बाबत त्रैमासिक बुलेटीन, सहामाही बुलेटीन व स्थापत्य बुलेटीन प्रकाशित करणे. अशा प्रकारची कामे या कक्षामार्फत केली जातात.

धरण पुनर्स्थापना व सुधारणा प्रकल्प (टप्पा २) —

केंद्र शासनाच्या जलसंपदा, नदी विकास आणि गंगा पुनरुत्थान (जलशक्ती) मंत्रालयाचा धरण पुनर्स्थापना व सुधारणा प्रकल्प (DRIP) हा एक प्रमुख प्रकल्प आहे. ड्रिप २ व ३ अंतर्गत १८ राज्ये व २ केंद्रीय संस्था समाविष्ठ आहेत. ड्रिप २ व ३ चा एकूण कालावधी १० वर्षे आहे सदर योजना एप्रिल २०२० ते मार्च २०३० कालावधीत राबविण्यात येणार आहे. ड्रिप २ व ३ ही योजना संपूर्ण देशातील सुमारे ६०० धरणांसाठी नियोजित आहे.

उद्दिष्टे :-

सदर प्रकल्पाचे खालील प्रकारे उद्दिष्टे आहेत.
धरण सुरक्षितता सुधारणे ,कार्यक्षमता वाढविणे,संस्थेचे सबलीकरण तसेच दीर्घकालीन कार्यक्षमता सुधारणे.

स्टेट प्रोजेक्ट मॅनिटरींग युनिट (SPMU)

धरण सुरक्षितता संघटना, केंद्रीय जल आयोग, नवी दिल्ली यांच्या अधिपत्याखाली केंद्रीय प्रकल्प समन्वय कक्षेच्या (CPMU) धर्तीवर दि. 11/04/2019 रोजीच्या शासन निर्णयान्वये केंद्रशासन, जागतिक बँक व राज्यस्तरावरील प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा यांचेशी समन्वय साधणे व प्रस्तावांच्या तपासण्या करण्यासाठी स्टेट प्राजेक्ट मॅनिटरींग युनिटची स्थापना करण्यात आली आहे. धरण पुर्नस्थापना व

सुधारणा प्रकल्पाचे व्यवस्थापन करणेसाठी तसेच प्रशासकीय कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने सदर कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. सदर SPMU चे प्रकल्प संचालक म्हणून अधीक्षक अभियंता, धरण सुरक्षितता संघटना, नाशिक हे असुन व नोडल अधिकारी म्हणून मुख्य अभियंता, जलविज्ञान व धरण सुरक्षितता, नाशिक हे आहेत.

६. पाणी उपलब्धता प्रमाणपत्र

जलविज्ञान प्रकल्पाकडे विश्वासार्ह व गुणवत्तापूर्ण जलहवामान विषयक आधार सामग्री जमा झाल्याने आणि जलशास्त्रीय माहिती प्रणाली मध्ये प्रशिक्षित मनुष्यबळ, टप्पा-१ मध्ये विविध संगणक प्रणाली उपलब्ध झाल्याने त्याचा वापर करण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने ५ द.ल.घ.फु. (१५० ह.घ.मी.) पेक्षा अधिक क्षमतेच्या सर्व प्रकल्पांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र देण्याचे काम मुख्य अभियंता, जलविज्ञान व धरण सुरक्षितता नाशिक यांचेकडे सोपविलेले आहे. नवीन प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यापूर्वी हे प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

७. मुख्य अभियंता, जलविज्ञान व धरण सुरक्षितता कार्यालय नाशिक तर्फे प्रकाशित करण्यात आलेली पुस्तके

- दरवर्षी जलपुस्तिका प्रकाशित करण्यात येते. कृष्णा-भीमा खोरेअंतर्गत एककालिक पूरांचे अंदाज व धरणातील पाण्याचे परिचालन मान्सून २०१८ चे अहवाल, जलगती संशोधन विभाग नाशिक या कार्यालयाकडील मोडेल लिस्ट प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.
- केंद्रीय जलआयोग, नवी दिल्ली यांच्या सुचने नूसार निश्चित करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वास अनुसरून मोठया धरणांचा वार्षिक एकत्रित धरणस्थिती अहवाल प्रसिद्ध करण्यात येतो.

८. जलहवामान आधार सामग्री उपभोक्ता गट (HDUG)

जलहवामान आधार सामग्री उपभोक्ता गट हे आधार सामग्री वापरकर्त्यांचे राज्य व राष्ट्रस्तरीय प्रातिनिधिक गट आहे.

जलहवामान आधार सामग्री उपभोक्ता गट स्थापन करण्याचे हेतू:

- जलहवामान आधार सामग्री पुरवठादारक व वापरकर्ते यांच्यामध्ये सामाईक व्यासपीठ तयार होणेसाठी.
- वापरकर्त्यांमध्ये जलविज्ञान विषयक माहिती प्रणाली विषयी जागृती येणेसाठी.
- आधार सामग्री वापरकर्त्यांच्या गरजा समजणेसाठी, गरजांचे विश्लेषन करणेसाठी व माहिती अद्यावत करणेसाठी.
- आधार सामग्री संकलनाच्या जाळ्यांमध्ये काही गोष्टी वाढविणे किंवा हटविणेसाठी पुनर्विलोकन करणे व त्यावर योग्य ती शिफारस करणे.

विविध संस्थान मार्फत जलहवामान आधार सामग्री वापरण्यात येत आहे. उदा. जलसंपदा विभाग, पाणी पुरवठा विभाग, जल संवर्धन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, रेल्वे विभाग, वन विभाग, प्रदूषण नियंत्रण मंडळ, खासगी संस्था, शैक्षणिक संस्था, विद्यार्थी, संशोधक व इतर राज्य व केंद्रीय संस्था, इत्यादी. जलहवामान आधार सामग्री उपभोक्ता गटातील सदस्यांनाच सदर माहिती पुरविण्यात येते.उपभोक्ता गटाचे सभासदत्व सर्वांना खुले असून सभासद शुल्क रु.५००/- पाच वर्षाच्या कालावधी करिता वैध राहील व शुल्क रु.२,५००/- आजीवन वैध राहील. उपभोक्त्यांना त्यांचा वर्गवारीनुसार सशुल्क किंवा निशुल्क वितरीत करण्यात येते. आधार सामग्रीचे

दर, त्यामधील सवलत, सभासदत्व नोंदणी व आधार सामग्री मागणी पत्र ई. संबंधित माहिती ‘www.mahahp.gov.in’ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

९. संपर्कासाठी माहिती.

अ. क्र.	कार्यालयाचे नाव	कार्यालयाचा पत्ता	दूरध्वनी क्र.	ई-मेल आय
१.	मुख्य अभियंता, जलविज्ञान व धरण सुरक्षितता, नाशिक	जलविज्ञान भवन, सीडीओ-मेरी परिसर दिंडोरी रोड नाशिक-४, महाराष्ट्र राज्य (भारत)	०२५३-२५३०२२७	cehp.nashikwrd@maharashtra.gov.in, cehpswnasik@gmail.com
२.	अधीक्षक अभियंता, आधार सामग्री संकलन, नियोजन व जलविज्ञान मंडळ, नाशिक	जलविज्ञान भवन, सीडीओ-मेरी परिसर दिंडोरी रोड नाशिक-४, महाराष्ट्र राज्य (भारत)	०२५३-२५३२९७२	sedcphpc.nashikwrd@maharashtra.gov.in
३.	अधीक्षक अभियंता, आधार सामग्री पृथःकरण मंडळ, नाशिक	जलविज्ञान भवन, सीडीओ-मेरी परिसर दिंडोरी रोड नाशिक-४, महाराष्ट्र राज्य (भारत)	०२५३-२५३३४०८	sedac.nashikwrd@maharashtra.gov.in, sedacnashik@gmail.com
४.	अधीक्षक अभियंता, धरण सुरक्षा संघटना मंडळ, नाशिक	सी.डी.ओ.इमारत, दिंडोरी रोड नाशिक-४, महाराष्ट्र राज्य (भारत)	०२५३-२५३००३०	se.damsafety@gmail.com, sedso.nashikwrd@maharashtra.gov.in
५.	कार्यकारी अभियंता, जलहवामान आधार सामग्री प्रक्रिया विभाग नाशिक	जलविज्ञान भवन, सीडीओ-मेरी परिसर दिंडोरी रोड नाशिक-४, महाराष्ट्र राज्य (भारत)	०२५३- २५३२९६४	eehdpd.nashikwrd@maharashtra.gov.in, sdscnashik@gmail.com
६.	कार्यकारी अभियंता, जलनियोजन विभाग (येवा), नाशिक-४२२००४ महाराष्ट्र राज्य (भारत)	जलविज्ञान भवन, सीडीओ-मेरी परिसर दिंडोरी रोड नाशिक-४, महाराष्ट्र राज्य (भारत)	-	eewpdnashik@gmail.com ; eewpd.nashik@wrd.maharashtra.gov.in
७.	कार्यकारी अभियंता, जलनियोजन विभाग (पूर), नाशिक-४२२००४ महाराष्ट्र राज्य (भारत)	सी.डी.ओ.इमारत, दिंडोरी रोड नाशिक-४, महाराष्ट्र राज्य (भारत)	०२५३२-९७०२६६	eewpdnashik@gmail.com ; eewpd.nashik@wrd.maharashtra.gov.in
८.	संशोधन अधिकारी, जलगती संशोधन विभाग, नाशिक	पाटा जवळ, दिंडोरी रोड नाशिक-४, महाराष्ट्र राज्य (भारत)	०२५३-२५११७५५	rohydro1@gmail.com
९.	जलविज्ञान प्रकल्प विभाग, पुणे	जी बरेक मध्यवर्ती इमारत पुणे - ४११००१,महाराष्ट्र राज्य (भारत)	०२०-२६१२६९१८	eehpd.pune@gmail.com
१०.	जलविज्ञान प्रकल्प विभाग, औरंगाबाद	जलविज्ञान प्रकल्प विभाग,डॉ.हेडगेवार रुग्णालयाच्या बाजूस,गारखेडापरिसर, औरंगाबाद ४३१००५,महाराष्ट्र राज्य (भारत)	०२४० २३२१४२८	Pbhpdabad@Gmail.Com
११.	जलविज्ञान प्रकल्प विभाग, नागपूर	जलसंपदा भवन, वैनगंगा नगर,अजनी नागपूर-४४०००३,महाराष्ट्र राज्य (भारत)	०७१२-२८९०१४६	eehpdiv.nagpur@gmail.com
१२.	जलविज्ञान प्रकल्प विभाग, अमरावती	विभागीय आयुक्त कार्यालय परीसर, अमरावती-४४४६०२,महाराष्ट्र राज्य (भारत)	०७२१-२६६२८२६	eehpd.amravati@gmail.com
१३.	जलविज्ञान प्रकल्प विभाग, ठाणे	सहकार विद्यालय समोर, मुंबई पुणे महामार्ग, कळवा (ठाणे) पिन-४००६०५ महाराष्ट्र राज्य (भारत)	०२२-२५४२६०५३	eehpthn@rediffmail.com
१४.	कार्यकारी अभियंता, धरण सुरक्षितता विभाग क्र.१ नाशिक	सी.डी.ओ.इमारत, दिंडोरी रोड नाशिक-४, महाराष्ट्र राज्य (भारत)	०२५३-२५३००३०	eedsdiv1@gmail.com
१५.	कार्यकारी अभियंता, धरण सुरक्षितता विभाग क्र.२ नाशिक	सी.डी.ओ.इमारत, दिंडोरी रोड नाशिक-४, महाराष्ट्र राज्य (भारत)	०२५३-२५३००३०	eedsd2nashik@gmail.com
१६.	कार्यकारी अभियंता, धरण सुरक्षितता विभाग क्र.३ नाशिक	सी.डी.ओ.इमारत, दिंडोरी रोड नाशिक-४, महाराष्ट्र राज्य (भारत)	०२५३-२५३००३०	dsdiv3@gmail.com
१७.	कार्यकारी अभियंता, कालवा सुरक्षितता विभाग नाशिक	सी.डी.ओ.इमारत, दिंडोरी रोड नाशिक-४, महाराष्ट्र राज्य (भारत)	०२५३-२५३००३०	eecsddsonsk@gmail.com
१८.	उपकरणे संशोधन विभाग नाशिक	मेरी परिसर, दिंडोरी रोड नाशिक-४, महाराष्ट्र राज्य (भारत)	०२५३-२५३००३०	roird.dso@gmail.com
१९.	कार्यकारी अभियंता, धरण सुरक्षिता कक्ष नाशिक	सी.डी.ओ.इमारत, दिंडोरी रोड नाशिक-४, महाराष्ट्र राज्य (भारत)	०२५३-२५३००३०	pdspmudso@gmail.com
२०.	उपविभागीय अभियंता, आधार सामग्री साठवण कक्ष नाशिक	जलविज्ञान भवन, सीडीओ-मेरी परिसर दिंडोरी रोड नाशिक-४, महाराष्ट्र राज्य (भारत)	०२५३-२५३१७७७	sdscnashik@gmail.com